माहितीचा
अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : १२८/२०२२**

**तक्रारकर्ता- श्री.ईश्वरप्रसाद नंदलाल झारणे,**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसचिव,**
राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : १३.१२.२०२२**

**तक्रारकर्ता** : अनुपस्थित
**जन माहिती अधिकारी** : उपस्थित
**प्रथम अपीलीय अधिकारी** : उपस्थित

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| १४.०६.२०२२ | -- | २०.०६.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार अपील क्र. ८८४/२०२०, दिनांक १४.०६.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर आज दिनांक १३.१२.२०२२ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या (द्वितीय अपील क्र. ८८४/२०२०) मध्ये दिनांक १४.०६.२०२२ रोजी सुनावणी घेवून "एकाच विषयाची जर एखादा व्यक्ती वारंवार एकसारखीच अथवा थोडासा बदल करून माहिती अर्ज सादर करीत असल्यास जन माहिती अधिकारी यांना यापुर्वीच माहिती पुरविण्यात आलेली असल्यामुळे कोणतीही माहिती

देय नाही, अशा प्रकारचा प्रतिसाद देण्याचे स्वतंत्र आहे, वरील बाब लक्षात घेता, या प्रकरणात संपुर्ण माहितीचे प्रदान केलेले असल्यामुळे " प्रस्तुत व्दितीय अपील खारीज करण्यात येत आहे.

मात्र, उपरोक्त आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे तक्रारकर्ता यांनी दिनांक २०.०६.२०२२ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावरील आज दि.१३.१२.२०२२ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आले की, अपिल क्र. ८८४/२०२०, दि. १४.०६.२०२२ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांचे जोडपत्र-अ नुसार विषयांकित माहिती प्रदान करण्यात आली असल्याने व्दितीय अपिल खरीज करण्यात आले. तत्कालिन जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी महात्मा फुले मागास वर्ग विकास महामंडळ, मर्यादित यांच्यावतीने अपिलार्थी यांची सेवा ब्रिक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनी मार्फत घेण्यात आली. परंतु संबंधित संस्थेची मनुष्यबळाची सेवा संपुष्टात आली. अपिलार्थी यांना दि. ०४.०६.२०१८, दि. १८.०७.२०१८, दि. १४.०६.२०१९, दि. ३०.०१.२०२०, दि. ०८.१२.२०२१ व दि. ३१.०५.२०२१ रोजी वेळोवेळी माहिती पुरविण्यात आलेली आहे.

वारंवार एकाच प्रकारची माहिती वरील प्राधिकारणास मागितली असून, त्या बाबीची नोंद **मा. केंद्रीय माहिती आयोग यांनी H.K. Bansal - Vs – Department of Telecommunication, New Delhi, तसेच** तसेच **Mr. Ramesh Cnand Jain Vs Delhi Transport Corporation** या प्रकरणात दिलेल्या निर्णयाप्रमाणे अशा प्रकार वारंवार एकाच प्रकारची माहिती मागणे ही माहिती अधिकार ~~कायद्याचे~~ कायद्याचा धडधडीत दुरुपयोग होत असल्याने मा. केंद्रीय माहिती आयोगाचे निर्णयानुसार वरील अपिल अर्ज फेटाळण्यात आले.

अपिलार्थी श्री. झारणे यांनी कलम १८ (१) अन्वये, दि. २०.०६.२०२२ रोजी दुसरा तक्रार अर्ज दाखल केला.त्यात तत्कालिन जनमाहिती अधिकारी श्री. व्हि. वाय ठाकूर व प्रथम अपिलीय अधिकारी श्रीम. जे. एन. देवकते या दोघानी आयोगास खोटी, दिशाभूल करणारी माहिती प्रदान करण्यात आली असल्याचे नमूद केले. तसेच ज्या दिवशी सुनावणीस घेण्यात आली तेव्हा ते अनुपस्थित असल्यामुळे वरील आदेश पारित करण्यात आले असे नमूद केले आहे. त्यानुषंगाने त्यांनी आयोग कार्यालयात माहिती अर्ज दाखल केला.त्यानंतर प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचे आढळून येते. आयोगाचे प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसचिव यांनी खालीलप्रमाणे दि.२२.११.२०२२ रोजी आदेश पारित केले आहे.

"अपीलकर्ता यांनी दिनांक २२.०९.२०२२ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचेकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (१) अन्वये ऑनलाईन प्रथम अपील दाखल केले.

जगभर आकस्मिक उद्भवलेला कोविड १९-चा प्रादुर्भाव व भारतामध्ये देखील पसरलेला संसर्ग यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने समाजिक अंतर राखण्याची झालेली अपरिहार्यता यामुळे प्रत्यक्षात प्रथम अपीलाची सुनावणी घेण्याबाबत विचार करण्यात आला. तसेच महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०५ जून २०२०

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर सत्यमेव जयते

रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार ई-मेल, व्हॉट्स ॲप, एसएमएस व भ्रमणध्वनीवरील कॉल हे कार्यालयीन कामकाजासाठी ग्राह्य मानावे असे निर्देश आहेत. त्याप्रमाणे प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेण्यासंदर्भात अपिलार्थी यांना दि. ०७.०१.२०२१ रोजी दुरध्वनीवरून संपर्क साधुन त्यांना ऑनलाईन सुनावणी घेणे अपेक्षित आहे किंवा प्रत्यक्षात सुनावणी घेणे योग्य राहील याबाबत विचारणा करण्यात आली. त्यावर अपिलार्थी यांनी दुरध्वनीवरून सुनावणी घेण्यास इच्छुकता दर्शविली.

त्यानुसार आज दि.२२.११.२०२२ रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी ऑनलाईन उपस्थित होते. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (अपील शाखा) श्रीमती दिपाली शाहारे उपस्थित होत्या.

अपिलार्थी यांनी दि.२०.०८.२०२२ रोजी सादर केलेला माहिती अर्ज दि.३०.०८.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. सदर अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी आयोगात दाखल केलेल्या व्दितीय अपिल क्र.८८४/२०२० चा सुनावणी दि.२८.०४.२०२२ मध्ये उपस्थित असलेल्या जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची नावे, अपिल आदेशाची प्रत तसेच अपिला संबंधित कागदपत्रांच्या माहितीची मागणी केली आहे. माहिती अर्जा संदर्भात जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी दिनांक ०६.०९.२०२२ च्या पत्रान्वये अपिलार्थीस व्दितीय अपिल क्र. ८८४/२०२० या नस्तीमधील माहितीची १४ पाने साक्षांकित करून विनामुल्य पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०६.०९.२०२२ रोजी दिलेले उत्तर योग्य असून विहीत मुदतीत दिले असल्याचे दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या उत्तरा संदर्भात माहिती चुकीची/ जाणीवपुर्वक अपुर्ण असे कारण नमूद करून अपिलार्थी यांनी प्रथम अपील दाखल केले आहे.

प्रथम अपील सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, व्दितीय अपिल क्र. ८८४/२०२० या अपिलावर दि.२८.०४.२०२२ रोजी झालेल्या सुनावणीचे आदेश अपेक्षित आहेत. सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी व्दितीय अपिल नस्ती क्र.८८४/२०२० सादर केली. सदर नस्तीचे अवलोकन केले असता आयोगाच्या जावक क्र.२११३,दि.०१.०४.२०२२ अन्वये दि.२८.०४.२०२२ रोजीच्या सुनावणीची सुचना निर्गमित करण्यात आली होती. दि.२८.०४.२०२२ रोजी सुनावणीस अपिलार्थी उपस्थित असल्याची नोंद आहे. मात्र संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित होते. याबाबत त्यांनी दि.१३.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. दि.२८.०४.२०२२ रोजी संबंधित अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे सदर व्दितीय अपिलाची सुनावणी पुढील तारखेस म्हणजेच दि.१४.०६.२०२२ रोजी आयोजित करण्यात आली. सदर दिवशी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस उपस्थित होते मात्र अपिलार्थी अनुपस्थित होते. दि. १५.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये दि.१४.०६.२०२२ रोजीची सुनावणी सुचना प्राप्त न झाल्यामुळे ते सुनावणीस उपस्थित राहू शकले नाही असे कळविले आहे. दि.१४.०६.२०२२ रोजीच्या सुनावणीची सुचना जावक क्र.३३३१, दि.१९.०५.२०२२ रोजी निर्गमित करण्यात आली आहे. उपरोक्त वस्तूस्थिती पाहता व्दितीय अपिल क्र.८८४/२०२० या अपिलावरील दि.२८.०४.२०२२ रोजी आयोजित केलेली सुनावणी पुढे ढकलण्यात येवून दि.१४.०६.२०२२ रोजी घेण्यात आली त्यामुळे दि.१४.०६.२०२२ रोजीचे अपिल आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. उपरोक्त वस्तूस्थिती लक्षात घेता जन

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर *नागपूर* सत्यमेव जयते

माहिती अधिकरी यांनी अर्जदारास पुरविलेली माहिती योग्य आहे. त्यामुळे सदर प्रथम अपील निकाली काढण्यात येत आहे."

दाखल केलेल्या तक्रार अर्जाचे अवलोकन केले असता व प्रथम अपिल अर्जावर पारित केलेले आदेश लक्षात घेता, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ नुसार दाखल केलेल्या अर्जाबाबत उपलब्ध असलेली माहिती ही त्यांना याआधीच तत्कालिन जनमाहिती अधिकारी यांनी कलम २ च नुसार प्रदान केली आहे. अपिलार्थी यांना सुनावणी संदर्भात सूचना प्रदान केले असता, ते दाखल तक्रार अर्जावर सुनावणीस उपस्थित नव्हते. तसेच अपिलार्थी यांनी केलेल्या तक्रार अर्जात कुठलेच तथ्य नसल्याने तक्रार अर्ज खारिज करण्यात येत आहे. सबब, प्रस्तुत तक्रार अर्ज खारीज करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज खारीज करण्यात येत आहे.

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नागपूर**

**नागपूर**
**दिनांक १३.१२.२०२२**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते

**जा.क्र.**-1317-----**दि.**------------

24 FEB 2023

E:\A\S तक्रार शाखा\सुनावणी दि.13.12.2022\त.क्र.128-2022-झारणे.docx